देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाचे,
न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं.रा. सप्रे वाणिज्य आणि
विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, (स्वायत्त)
कै.काकासाहेब पंडीत शैक्षणिक संकुल. देवरूख. ४१५ ८०४ (जि. रत्नागिरी)
मुंबई विद्यापीठ सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार २००९-१०
Reaccredited by NAAC with 'A' Grade-3rd Cycle

# महाविद्यालय विकास समिती
## वार्षिक अहवाल २०२१-२२

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या ०३ बैठका पार पडल्या सदर बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या मागील सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा स्वायत्त महाविद्यालयाच्या कामकाजाचा आढावा सभेसमोर ठेवण्यात आला. महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरच्या दुसऱ्या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात आलेले नविन अभ्यासक्रम, महाविद्यालयाची कामगीरी यावर सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले व सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.
- वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश व परीक्षा विभागाच्या डीजीटायझेशन प्रोजेक्ट संदर्भात माहिती सभेला देण्यात आली व महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रीया ऑनलाईन पद्धतीने पार पाडण्यासाठी, शासनाला आवश्यक असणारे विविध अहवाल एका क्लीक वर तयार होण्यासाठी व बदलेल्या परीक्षा पद्धतीशी जुळवुन घेण्यसासठी कोटेशन प्रक्रीया राबवून यामधील मास्टरसॉफ्ट या कंपनीचे सॉफ्टवेअर हे उपयुक्त असल्याने मास्टरसॉफ्ट या कंपनीची निवड करण्यात आली असल्याचे सभेला सांगण्यात आले.
- स्वायत्त महाविद्यालयासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार पद्व्युत्तर विभागाची प्रवेश क्षमता मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. CAD/Aff/ICC/(2021-22)/08/of 2021 दि.०४/०८/२०२१ नूसार विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने स्वायत्त महाविद्यालयासाठी दि.२९/०६/२०२१ रोजी पारित केलेल्या ठरावाला अनुसरून २० वरून ४० वर करण्यात आल्याचे सभेला सांगण्यात आले. आता पदव्युत्तर विभागाची प्रवेश क्षमता पुढील प्रमाणे असेल

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | वाढीव प्रवेश क्षमता (१०%) | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एस्सी. ऑरगॅनिक केमिस्ट्री | ४० | ४ | ४४ |
| २ | एम.एस्सी. ॲनालेटिकल केमिस्ट्री | ४० | ४ | ४४ |
| ३ | एम.एस्सी. फिजीक्स | ४० | ४ | ४४ |
| | एकुण | १२० | १२ | १३२ |

- दि.२६/१०/२०२१ रोजी महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ या दोन्ही वर्षाचे शैक्षणिक व प्रशासन ऑडीट करण्यासाठी समिती महाविद्यालयाला भेट देणार असल्याचे सभेला सांगण्यात आले.
- तृतीय वर्ष कला/वाणिज्य / विज्ञान व पदव्युत्तर एम.एस्सी. व एम.ए. या वर्गांच्या मार्च / एप्रिल २०२१ च्या परीक्षांचा निकाल सभेसमोर सादर करण्यात आला.
- आर्थिक वर्ष २०२०-२१ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमाखर्च पत्रक, ताळेबंद यावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.
- आर्थिक वर्ष २०२१-२२ चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा तपशिल सभेसामोर मांडण्यात आला.
- दि. ०१/००७/२०२० ते ३१/०७/२०२१ या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नियमबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा अहवाल आणि सन  २०२१-२२ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले, त्याला सभेने मंजुरी दिली.
- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी महाविद्यालयातील विनाअनुदानित तत्वावर पदवी व पद्व्यत्तर विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती करण्या विषयी धोरण ठरविण्यात आले.
- महाविद्यालयातील परिविक्षाधीन कालावधी संपलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परिविक्षाधीन काळातील कामकाज समाधानकारक असल्याने त्यांना सेवेत कायम करण्याचा ठराव करण्यात आला.
- शासन आदेश क्र. मान्यता २०२१/(५६/२१) /मशि-४, दि. २६ ऑगस्ट,२०२१ नुसार महाविद्यालयातील B.Voc. अभ्यासक्रमा अंतर्गत यु.जी.सी. मान्यताप्राप्त पुढील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून पुर्वलक्षी प्रभावाने कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली.
    1. **जिओइन्फोमॅटीक्स फॉर व्हीलेज रिसोर्स मॅपींग (Geoinformatics for Village Resource Mapping)**
    2. **सस्टेनेबल ॲग्रीकल्चर (Sustainable Agriculture)**
    3. **बँकीग ॲण्ड फायनानशीअल सर्व्हीसेस (Banking & Financial Service)**
- महाविद्यालयात B.Voc. अभ्यासक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी नविन पॅरामेडीकल कोर्सेस, स्किल कोर्सेस सुरू करण्या विषयी चर्चा करण्यात आली.
- कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयात  सुरू करण्यात आलेले नविन अभ्यासक्रम व  वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता शिस्त, प्रशासन व व्यवस्थापन अधिक सुलभ व विद्यार्थी केंद्रीत होण्याच्या दृष्टीने उपप्राचार्य पद निमार्ण करून नियुक्ती करण्याचे ठरविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

- नॅकच्या मार्गदर्शक सूचनेनूसार संशोधन, देखभाल इत्यादी संदर्भात धेय धोरणे व संहीता प्रारूप तयार करून सभेसामोर मान्यतेसाठी ठेवण्यात आली व खालील विषयांशी निगडीत धेय धोरणे व संहीतेला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

  १. संशोधन २. देखभाल ३. पर्यावरण ४. माहिती तंत्रज्ञान ५. आचार संहिता

- महाविद्यालयातील पदव्युत्तर विभागाचे एकच बँक खाते स्टेट बँक ऑफ इंडीया, देवरूख शाखेत असल्याने भविष्यातील खरेदी किंवा देय रकमांची तरतुद करण्यासाठी रक्कम बाजूला काढून ठेवण्यासाठी पदव्युत्तर विभागाचे डिपोझीट खाते उघडण्याविषयी नियामक मंडळाकडे शिफारस करण्याचे ठरविण्यात आले.
- दिनांक ०१/०८/२०२१ ते ३१/०१/२०२२ या कालावधीतीत कर्मचाऱ्यांनी उपभोगलेल्या रजा नियमबरहुकूम असल्यामुळे रजांना मंजूरी देण्यात आली.
- महाविद्यालयाकरिता नविन जनरेटर खरेदी करण्याविषयी चर्चा करण्यात आली व महाविद्यालयाला आवश्यक असणारा बॅकअपचा लोड काढण्यात येऊन विविध कंपन्यांकडून कोटेशन मागवून खरेदी प्रक्रीया करावी असे सर्वांनूमते ठरविण्यात आले.
- विनाअनुदानित विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वार्षिक नैमित्तीक व इतर रजा ठरविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य